# ६२ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा

## सोलापूर केंद्रातून ‘समांतर’ प्रथम

---

**मुंबई, दि.१३ डिसेंबर** : ६२ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत सोलापूर केंद्रातून **झपुर्झा नाट्य मंदिर, सोलापूर** या संस्थेच्या **समांतर** या नाटकाला प्रथम पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक श्री. बिभीषण चवरे यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या नाटकाची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे **सोलापूर** केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे-

**शोध क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक संस्था, कुर्डूवाडी** या संस्थेच्या **दुसरा अंक** या नाटकास द्वितीय पारितोषिक **स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस अँड फाईन आर्टस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ** या संस्थेच्या **खिडक्या** या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. **दिग्दर्शन**: प्रथम पारितोषिक अश्विनी तडवळकर (नाटक-समांतर), द्वितीय पारितोषिक डॉ.सायली सुर्वे (नाटक-दुसरा अंक), **प्रकाश योजना** प्रथम पारितोषिक उमेश बटाणे (नाटक- ज्ञ), द्वितीय पारितोषिक स्वप्ना (नाटक-खिडक्या), **नेपथ्य** : प्रथम पारितोषिक उमा निमसुडकर (नाटक- गोष्ट जन्मांतरीची) द्वितीय पारितोषिक ॲड. मळसिध्द देशमुख (नाटक- ॲनिमल प्लॅनेट) **रंगभूषा** : प्रथम पारितोषिक प्रथमेश श्रावण (नाटक- ज्ञ), द्वितीय पारितोषिक प्रतीक तांदळे (नाटक- चांदणी) **उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक** संतोष सुर्वे (नाटक-दुसरा अंक) व अश्विनी तडवळकर (नाटक- समांतर), **अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे** अपर्णा जोशी (नाटक- विठु माझा लेकुरवाळा), चित्रगंधा निकंबे (नाटक-मजार), श्रुतिका महिंद्रकर (नाटक-ॲनिमल प्लॅनेट), श्वेता गावडे (नाटक- खिडक्या), प्रतिमा माने (नाटक-दुसरा अंक), दत्ता वाघमारे (नाटक- गोष्ट जन्मांतरीची), इम्तियाज मालदार (नाटक- ॲनिमल प्लॅनेट), अमोल देशमुख (नाटक- खिडक्या), कुबेर शास्त्री (नाटक-ज्ञ) सागर पवार (नाटक-समांतर)

दि. २० नोव्हेंबर २०२३ ते ११ डिसेंबर २०२३ या कालावधीत हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण १४ नाट्य प्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. वसंत दातार, श्री. किरण येवलेकर आणि श्री. अनिल पालकर यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव श्री. विकास खारगे यांनी विजेत्यांचे अभिनंदन केलेले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी प्रथम आलेल्या नाटकाच्या संघाचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले असून भविष्यातही या संघांनी व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

⊗⊗⊗